राज्यसेवा आयोगाकडून संधी : मोठा दिलासा

# स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना प्रोफाईलमध्ये बदल करण्याची मुभा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षा देण्यासाठी संकेतस्थळावरील ऑनलाइन प्रोफाइलमध्ये विद्यार्थ्यांनी ई-मेल आयडी, मोबाइल नंबर, वजन, उंची, छाती आदींची एकदा नोंदणी केल्यानंतर त्यामध्ये बदल करता येत नव्हता. मात्र आयोगाकडून शुक्रवारी एक निवेदन प्रसिद्ध करून राज्यसेवेच्या पूर्व परीक्षेपर्यंत त्यामध्ये बदल करण्याची मुभा दिली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्यसेवेच्या स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांनी आयोगाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन प्रोफाइल तयार करून त्यामध्ये त्यांची सर्व माहिती भरणे बंधनकारक आहे. या ऑनलाइन प्रोफाइलमध्ये एकदा मोबाइल क्रमांक, ई-मेल आयडीची नोंदणी केल्यानंतर तो बदलता येत नव्हता. अशा प्रकारे प्रोफाइलमधील ई-मेल आयडी, मोबाइल क्रमांकात बदल करून एकापेक्षा जास्त प्रोफाइल उमेदवारांकडून तयार केले जात असल्याचे निदर्शनास आले होते, त्यामुळे आयोगाने त्यामध्ये बदल करण्यावर निर्बंध टाकले होते. प्रोफाईलमधील जातनिहाय वर्गवारी, शैक्षणिक अर्हता, अनुभव याबाबतची माहिती यामध्ये बदल करण्यास यापूर्वीच संमती देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना त्यामध्ये बदल करावयाचे झाल्यास आयोगाशी पत्रव्यवहार, ई-मेल करून बदल करून घ्यावा लागत होता. आयोगाकडून पूर्ण शहानिशा केल्याशिवाय हा बदल करून दिला जात नव्हता, त्यामध्ये बराच कालावधी जायचा.

अनेकदा विद्यार्थ्यांचे मोबाइल क्रमांक बदलणे, ईमेल ब्लॉक होणे, पासवर्ड विसरणे अशा अडचणींना त्यांना सामोरे जावे लागत होते. राज्यसेवा आयोगामार्फत नुकतेच ३५० पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. त्यामुळे विद्यार्थी मोठ्या संख्येने अर्ज करीत आहेत. हा अर्ज करताना मोबाइल नंबर, ई-मेल आयडी बदलल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यामध्ये बदल करून देण्यासाठी त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात आयोगाला विनंती केली जात होती.

या पार्श्वभूमीवर आगामी राज्यसेवा पूर्व परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या दिनांकापर्यंत विद्यार्थ्यांना मोबाइल नंबर, ई-मेल आयडी, उंची, छाती, वजन याबाबतचे बदल करण्यास आयोगाकडून मुभा देण्यात आली आहे.

## चुकीची माहिती भरली जाणार नाही याची घ्यावी खबरदारी

विद्यार्थ्यांनी प्रोफाइलमधील बदल करताना कोणत्याही परिस्थितीमध्ये खोटी व दिशाभूल करणारी माहिती भरली जाणार नाही, याची खबरदारी घ्यावी. त्याचबरोबर एकाच उमेदवाराचे एकापेक्षा जास्त प्रोफाइल तयार होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन राज्य लोकसेवा आयोगाकडून करण्यात आले आहे.



## मराठा आरक्षणाचे प्रमाणपत्र मिळवून नोंद करणे आवश्यक

- नव्याने लागू करण्यात आलेल्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (मराठा आरक्षण) प्रवर्गाची नोंद प्रोफाइलमध्ये करण्यास १५ डिसेंबरपासूनच मुभा देण्यात आली आहे.
- तरी पात्र उमेदवारांनी त्याबाबतचे जात प्रमाणपत्र मिळवून त्याची त्यांच्या प्रोफाइलमध्ये नोंद करणे आवश्यक आहे. त्यासाठी कोणतीही मुदत निर्धारित करून देण्यात आली नसून त्याबाबत आयोगाकडून स्वतंत्रपणे सूचना देण्यात येतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Main
Page No. ... 30 ... 18
Powered by: erelego.com